Session : 2

Date : 16/09/25

News: shahar Sanchar

# सायबर शिक्षा फॉर सायबर सुरक्षा यावर चिंचोलीकाटी शाळेत सेमिनार

शहर संचार



सोलापूर, दि. १५ - पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठातील संगणकशास्त्र संकुल, क्विक हिल फाऊंडेशन, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने पीएमश्री जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, चिंचोलीकाटी (ता.मोहोळ) येथे सायबर शिक्षा फॉर सायबर सुरक्षा हा उपक्रम राबविण्यात आला.

या उपक्रमामध्ये संगणकशास्त्र संकुलातील तेजश्री पवार व पूजा हंडे या विद्यार्थिनींनी सायबर शिक्षा फॉर सायबर सुरक्षा या विषयावर घेण्यात आलेल्या सेमिनारमध्ये सहभाग नोंदविला. त्यांनी आजच्या ऑनलाइन युगामध्ये होणाऱ्या विविध प्रकारच्या फसवणुकीबद्दल उदाहरणाद्वारे माहिती दिली. अशा प्रकारची फसवणूक होऊ नये म्हणून त्याबद्दल सर्वांनी काळजी घेण्याविषयी सविस्तर माहिती दिली. ओटीपी कोणास सांगू नये, अनोळखी नंबर वरून आलेले फोन कॉल्सची पडताळणी करून घेणे, व्हॉट्सअॅप व इतर सोशल मीडियावर आलेल्या मेसेजेस व लिंकची शहानिशा करावी व त्यानंतरच पुढील प्रक्रिया करावी. पासवर्ड स्ट्राँग वापरून आपली माहिती सुरक्षित करावी तसेच आपली माहिती ही आपली जबाबदारी आहे असे सांगितले. मोबाइल, कॉम्प्युटर, लॅपटॉप इत्यादी साधनावर अधिकृत अँटिव्हायरसचा वापर करावा. या कार्यक्रमास एकूण १७४ विद्यार्थी व १५ शिक्षक उपस्थित होते. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी हबीब नवाब पाटील यांचे मार्गदर्शन लाभले. मुख्याध्यापिका गीता म्हेत्रे यांनी आभार मानले.